MHBI120008822017

नियमित दिवाणी दावा क्र. १७०/२०१७ मधील निशाणी क्र.३३ वर आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असुन वाद पत्रामध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ नामे विनयकुमार अनंदमोहन तिवारी हे मयत असुन त्यांचे वारस म्हणून प्रतिवादी क्र. २/१ श्रीमती सुमन भ्र. विनयकुमार तिवारी, प्रतिवादी क्र. २/२ गिरीष विनयकुमार तिवारी, प्रतिवादी क्र. २/३ सारीका पिता विनयकुमार तिवारी, प्रतिवादी क्र. २/४ रोमेश पिता विनयकुमार तिवारी यांना दाव्यामध्ये शरीक करण्यात आलेले आहे. सदरील वारसांचे मयताशी नाते दाव्यामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. तसेच सदर दाव्यातील वादी क्र. १ नामे रत्नप्रकाश इंद्रमोहन तिवारी हे मयत असुन त्यांचे वारस म्हणून वादी क्र. १/१ रमा भ्र. रत्नप्रकाश तिवारी, वादी क्र. १/२ श्रुती पिता रत्नप्रकाश तिवारी, वादी क्र. १/३ श्वेता पिता रत्नप्रकाश तिवारी, वादी क्र. १/४ श्रेया पिता रत्नप्रकाश तिवारी यांना दाव्यामध्ये शरीक करण्यात आलेले आहे. तरी सदरील वारसांचे मयताशी दाव्यामध्ये नाते नमुद करणे आवश्यक आहे. तरी दाव्याच्या कलम नं. २ मध्ये शेवटी खालील प्रमाणे दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी.

३. मयत वादी क्र. १ रत्नप्रकाश इंद्रमोहन तिवारी यांची वादी क्र. १/१ ही पत्नी असुन वादी क्र. १/२, १/३, १/४ या मयत वादी क्र. १ यांच्या मुली आहेत. मयत प्रतिवादी क्र. २ नामे विनयकुमार अनंदमोहन तिवारी यांची प्रतिवादी

क्र. २/१ ही पत्नी असुन प्रतिवादी क्र. २/२ व प्रतिवादी क्र. २/४ हे मयत व प्रतिवादी क्र. २/१ यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र. २/३ ही मयत प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र २/१ ची मुलगी आहे. त्यामुळे दाव्याच्या कलम नं. २ मध्ये शेवटी दुरूस्ती करून लिहीण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे. सदर प्रकरणामध्ये वरील प्रमाणे दुरूस्ती केली नाही तर वादीचे कशानेही न भरून येणार अतोनात नुकसान होईल. सदरील दुरूस्तीमुळे दाव्याचे कुठलेही स्वरूप बदलत नाही व सदर दुरूस्तीमुळे वादीचे अथवा इतर कोणाचेही कसलेही नुकसान होत नाही. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने निशाणी क्र. ३४ अन्वये शपथपत्र सादर केले आहे.

४. सदर अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जास हरकत घेतली आहे.

५. अर्ज व शपथपत्र याचे अवलोकने केले असता असे दिसुन येते की, सदर दावा हा ताबा मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ०७.०२.२०२० रोजी वाद मुददे निश्चिीत करण्यात आलेले आहेत. परंतु सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपात कोणत्याही प्रकारचा कसलाही बदल होणार नाही. उलट दाव्यामधील मयत पक्षकारांचे त्यांच्या वारसांशी असणारे नाते स्पष्ट होणार आहे. सदर दुरूस्ती करण्यास परवानगी दिल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. वादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्याचे कलम नं. २ मध्ये शेवटी, 'मयत वादी क्र. १ रत्नप्रकाश इंद्रमोहन तिवारी यांची वादी क्र. १/१ ही पत्नी असुन वादी क्र. १/२, १/३, १/४ या

मयत वादी क्र. १ यांच्या मुली आहेत. मयत प्रतिवादी क्र. २ नामे विनयकुमार अनंदमोहन तिवारी यांची प्रतिवादी क्र. २/१ ही पत्नी असुन प्रतिवादी क्र. २/२ व प्रतिवादी क्र. २/४ हे मयत व प्रतिवादी क्र. २/१ यांची मुले आहेत. प्रतिवादी क्र. २/३ ही मयत प्रतिवादी क्र. २ व प्रतिवादी क्र २/१ ची मुलगी आहे,' अशी दुरूस्ती करावी.

३. वादी यांनी वादपत्रामध्ये प्रस्तावित दुरूस्ती पुढील तारखेस करावी व दुरूस्त दाव्याची प्रत द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAJENDRA VASANT KADAM
Date: 2022.02.05 11:15:55 +0530

(रा.व.कदम)
दि. ०४.०२.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
धारूर

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड–३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०४.०२.२०२२ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०४.०२.२०२२ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०५.०२.२०२२ |

सही/–
(**ए.एस.गंगणे**)
(लघुलेखक ग्रेड–३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारुर